असा. क्र. २७ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, मे १९, २००५/वैशाख २९, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.**—महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम . . | ३३९-३४१ |

दिनांक १७ मे २००५ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १९ मे २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— (१९६६ चा महा. ३७.)

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २००५ असे म्हणावे. (संक्षिप्त नाव व प्रारंभ.)

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९६६ चा महा. ३७.

(क) खंड (२७) मध्ये, " परिमंडळ विषयक विनियमांचा " या मजकुराऐवजी " परिमंडळ विषयक विनियमांचा, विशेष विकास नियंत्रण विनियमांचा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (३०) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (३०क) " विशेष नगर वसाहत प्रकल्प " या संज्ञेचा अर्थ, कलम १८ किंवा, यथास्थिति, कलम ४४ अन्वये घोषित केलेला विशेष वसाहत प्रकल्प, असा आहे ; ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १८ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (३) पोट-कलमे (१) आणि (२) च्या तरतुदींना किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींना बाध न आणता, कोणत्याही जमिनीवर विशेष नगर वसाहत प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाकडे अर्ज करता येईल, आणि असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, राज्य शासनास, त्याबाबतीत त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशी परवानगी देता येईल आणि असा प्रकल्प, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष नगर वसाहत प्रकल्प असल्याचे घोषित करता येईल किंवा अर्ज नाकारता येईल. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ४४ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) पोट-कलम (१) च्या तरतुदींना किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींना बाध न आणता, कोणत्याही जमिनीवर विशेष नगर वसाहत प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाकडे अर्ज करता येईल, आणि असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, राज्य शासनास, त्याबाबतीत त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशी परवानगी देता येईल आणि असा प्रकल्प, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष नगर वसाहत प्रकल्प असल्याचे घोषित करता येईल किंवा अर्ज नाकारता येईल. ".

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १५९ ला, त्या कलमाचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात येईल आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १५९ ची सुधारणा.

" (२) राज्य शासनास, विशेष नगर वसाहत प्रकल्पाच्या कार्यान्वयनाचे प्रयोजन पार पाडण्यासाठी, या अधिनियमाशी आणि त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असे विशेष विकास नियंत्रण विनियम करता येतील आणि असे विनियम, विकास योजनेच्या किंवा, यथास्थिति, प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण विनियमांचा भाग असतील. " .

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई